जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 AUG 2017
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्र परीक्षा प्रक्रियेस प्रारंभ



शिवाजी विद्यापीठातून

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्र परीक्षा प्रक्रियेस प्रारंभ झाला आहे. नव्या शैक्षणिक वर्षाच्या या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी २२ ऑगस्ट २०१७ पर्यंत ऑनलाईन पद्धतीने प्रवेश अर्ज भरण्याचे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. यानंतर अर्ज भरणाऱ्यांना विलंब आणि अतिविलंब शुल्क आकारले जाणार आहे. तसेच मुदतीनंतर कोणत्याही स्थितीत महाविद्यालयांनी अर्ज स्वीकारू नयेत, अशा सूचना करण्यात आल्या आहेत.

सर्वच परीक्षांसाठी ऑनलाईन अर्ज स्वीकारले जाणार असल्याने मॅन्युयल (हस्तलिखित) अर्ज विद्यार्थ्यांनी करू नयेत, तसेच महाविद्यालयांनी स्वीकारू नयेत, असे सांगण्यात आले आहे. एकाच बाकावर भिन्न विषयांतील विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था नियमानुसार असणार आहे, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

3 AUG 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या परीक्षा ४ ऑक्टोबरपासून

## वेळापत्रक जाहीर; हिवाळी सत्र; विनाविलंब शुल्कासह अर्ज करण्याची २२ ऑगस्टपर्यंत मुदत

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील हिवाळी सत्रातील (ऑक्टोबर-नोव्हेंबर) परीक्षांचा प्रारंभ दि. ४ ऑक्टोबरपासून होणार आहे. परीक्षा विभागाने याबाबतचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर केले आहे. या परीक्षांसाठी विनाविलंब शुल्कासह अर्ज करण्याची अंतिम मुदत दि. २२ ऑगस्टपर्यंत आहे.

विद्यापीठातर्फे बी.ए., बी. कॉम., बी. एस्सी. भाग एक, दोन, तीन,



बीसीएस., बीबीए., बीसीए., बीएबीएड., बीएस. डब्ल्यू., एम.ए., एम.बी.ए., एम.कॉम., एमसीए., एलएलएम, बी. टेक., एम. ई., मास्टर ऑफ व्हॅल्युएशन, बॅचलर ऑफ डिझाईन, अशा विविध अभ्यासक्रमांच्या ५६८ परीक्षा या हिवाळी सत्रामध्ये घेण्यात येणार आहेत. परीक्षांसाठी विनाविलंब शुल्कासह अर्ज करण्याची मुदत दि. २२ ऑगस्टपर्यंत आहे. ऑक्टोबरमध्ये दिवाळी असल्याने दि. १५ ते २२ या आठ दिवसांत आणि दि. १८ नोव्हेंबरला विद्यापीठाचा वर्धापन दिन असल्याने यादिवशी परीक्षा नाही.

विलंब शुल्कासहित अर्ज करण्याची मुदत दि. २३ ते २९ ऑगस्ट आणि अतिविलंब शुल्कासहितची मुदत दि. ३० ऑगस्ट ते ६ सप्टेंबरपर्यंत आहे. या मुदतीनंतर महाविद्यालयांनी विद्यापीठामध्ये परीक्षा अर्ज याद्या दि. २९ ऑगस्ट ते ८ नोव्हेंबरपर्यंत सादर करावयाच्या आहेत.

परीक्षांचे वेळापत्रक, अर्ज भरण्याची मुदत आदींबाबतची माहिती परीक्षा विभागाने कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील संलग्नित महाविद्यालये आणि विद्यापीठातील विविध अधिविभागांना ई-मेलद्वारे पाठविली आहे. शिवाय ती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहे.

3 AUG 2017 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# चंपारण्य सत्याग्रह ही सामाजिक आंदोलनाची एक प्रयोगशाळा

## जयंत दिवाण : शिवाजी विद्यापीठातील व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** चंपारण्य सत्याग्रह ही महात्मा गांधीजींची सामाजिक आंदोलनाची प्रयोगशाळा ठरली, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत जयंत दिवाण यांनी बुधवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील गांधी अभ्यास केंद्र आणि राज्यशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित डॉ. उषा मेहता स्मृती व्याख्यानांतर्गत ते बोलत होते. 'चंपारण्य लढ्याची शतकपूर्ती' असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. मानव्यशास्त्र सभागृहातील व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अशोक चौसाळकर होते. ज्येष्ठ विचारवंत दिवाण म्हणाले, चंपारण्य हे वसाहतवादाचे छोटेसे उदाहरण होते. त्याठिकाणी ७२ कोठीवाले म्हणजे ब्रिटिश लोकांची मक्तेदारी मोठ्या प्रमाणात होती. नीळ पेरण्यासाठी शेतकऱ्यांवर अन्याय, अत्याचार आणि जुलूम केले जात होते. या शोषणाविरुद्ध लढा देण्यासाठी गांधीजींनी प्रयत्न सुरू केले. हे कोठीवाले स्वत:ला सर्वेसर्वा समजत होते. शेतकऱ्यांवर मनमानी कर लावत होते. त्यांचे वैयक्तिक, मानसिक, शारीरिक व आर्थिक शोषण होत होते. अशा परिस्थितीत महात्मा गांधीजी त्या ठिकाणी गेले आणि त्यांच्या चंपारण्य येथील वैशिष्ट्यपूर्ण लढ्यामुळे हे आंदोलन एक सामाजिक आंदोलन ठरले.

डॉ. अशोक चौसाळकर म्हणाले, ब्रिटिशांची आर्थिक पकड महात्मा गांधीजींच्या चंपारण्यातील तीव्र लढ्यापुढे निष्फळ ठरली. यावेळी डॉ. भगवानराव माने, अवनिश पाटील उपस्थित होते. सामाजिक विज्ञान आणि कला विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले. राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार यांनी आभार मानले.



कोल्हापुरात बुधवारी शिवाजी विद्यापीठात ज्येष्ठ विचारवंत जयंत दिवाण यांचे व्याख्यान झाले. यावेळी डावीकडून प्रा. डॉ. प्रकाश पवार, अशोक चौसाळकर, भारती पाटील उपस्थित होत्या.

### रचनात्मक कामे

चंपारण्याच्या लढ्यामध्ये महात्मा गांधीजींनी रचनात्मक कामेही जोडली, असे ज्येष्ठ विचारवंत दिवाण यांनी सांगितले. ते म्हणाले, गांधीजींच्या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून गावचे रस्ते साफसफाई करणे, विहिरीजवळच्या चिखल काढणे, आश्रमशाळेमध्ये मुलांना एकत्र केले. त्यामुळे अत्याचारग्रस्त लोकांना खूप मोठा आधार मिळत गेला. पुढे चंपारण्याचा लढा यशस्वी झाला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 3 AUG 2017
तरूण भारत

# अण्णाभाऊंच्या साहित्याची पुनर्रचना होण्याची गरज

## कवी लहू कानडे यांचे मत

प्रतिनिधी
कोल्हापूर

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळ, गोवा मुक्ती संग्राम व साहित्य क्षेत्रात मोठे योगदान दिले आहे. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील नायक, नायिकांची पात्र बंडखोर आणि लढवैये आहेत. प्रस्थापित व्यवस्था मोडून त्यांनी आपल्या साहित्यातून पहिल्यांदाच सर्वसामान्य कुटुंबातील पात्रांच्या रूपाने अनेक प्रश्नाला वाचा फोडली आहे. त्यामुळे त्यांच्या कविता व साहित्याची पुनर्रचना होण्याची आज गरज आहे, असे मत कवी लहू कानडे यांनी व्यक्त केले.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतिनिमित्त शिवाजी विद्यापीठातील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे अध्यासन केंद्रातर्फे भाषा भवनमधील वि. स. खांडेकर सभागृहत 'अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होत. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी राज्यशास्त्र विभागाच्या डॉ. भारती पाटील होत्या.

कवी कानडे म्हणाले, सर्व समाजातील महापुरूषांनी उन्नत जगण्याचा मार्ग दाखविल्यामुळेच आजही त्यांचे स्मरण केले जाते. सध्या प्रत्येकजण जातीव्यवस्थेत गुरफटल्यानेच खोटे बोलण्याची सक्ती केली जात आहे. त्यामुळे साहित्यिक आणि कवींनी अण्णाभाऊ साठे यांचे जगणे नव्याने मांडण्याची गरज निर्माण झाली आहे. नवीन पिढीला अण्णाभाऊ साठे यांचे चरित्र समजले पाहिजे, तसेच त्यांच्या कादंबऱ्यांवर आधारीत तयार केलेले अनेक चित्रपट उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे हे चित्रपट उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने विशेष प्रयत्न करण्याची गरज आहे, अशी अपेक्षाही कानडे यांनी व्यक्त केली.



प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख व साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे अध्यासन केंद्रप्रमुख डॉ. राजन गवस यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत डॉ. शरद गायकवाड यांनी केले. आभार डॉ. नंदकुमार मोरे यांनी मानले. यावेळी डॉ. एम. एल. जाधव, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. मेघा पानसरे, ॲड. पंडीत सडोलीकर, दिलीप वायदंडे, यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

- 3 AUG 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अण्णाभाऊंच्या साहित्याचे पुनर्वाचन आवश्यक

## -लहू कानडे

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** अण्णाभाऊ साठेंच्या साहित्याचे पुनर्वाचन सध्याच्या तरुणांनी करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन साहित्यिक लहू कानडे यांनी केले. ते शिवाजी विद्यापीठातील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे अध्यासन केंद्रातर्फे विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहामध्ये अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

लहू कानडे म्हणाले, महापुरुषांची जयंती साजरी करण्यामागे त्यांनी जो समाजाला उन्नत मार्ग दाखविलेला आहे तो आपल्याला प्रशस्त करता यावा आणि आपले जगणे सुसह्य व्हावे हा त्यामागचा प्रमुख उद्देश आहे. आजचा तरुण विविध समाज माध्यमांद्वारे आपले मत व्यक्त करीत आहे, ही स्वागतार्ह बाब आहे. या व्यवस्थेचे रूपडे बदलण्यासाठी तरुणांना ही व्यवस्था आधी समजून घ्यावी लागेल. अध्यक्षस्थानावरून बोलताना सामाजिक विज्ञान आणि कला विद्याशाखेच्या



अधिष्ठाता डॉ. भारती पाटील म्हणाल्या, तरुणांना चांगली कामे करण्यासाठी संघर्षाची प्रेरणा या अध्यासन केंद्राकडून मिळते. बहुजन समाजातील तरुणांमध्ये क्रांतीचे स्फुल्लिंग निर्माण करण्याचे कार्य या केंद्राकडून होईल.

प्रास्ताविक अध्यासनाचे समन्वयक डॉ. राजन गवस यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. रणधीर शिंदे यांनी करून दिला, तर आभार डॉ. नंदकुमार मोरे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन करण्यात आले. त्यानंतर रंगराव पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी पोवाडे सादर केले. यावेळी अध्यासनाचे माजी समन्वयक डॉ. एम. एल. जाधव यांच्यासह आकाराम पाटील, डॉ. शरद गायकवाड, डॉ. मेघा पानसरे, डॉ. एस. एस. महाजन, डॉ. आर. व्ही. गुरव यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 AUG 2017
महाराष्ट्र टाईम्स

# शनिवारी व्याख्यान

**कोल्हापूर :** फुले-आंबेडकर विचारधारातर्फे विद्यार्थ्यांचा सत्कार व व्याख्यान होणार आहे. शिवाजी विद्यापीठाचे समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. जगन कराडे व प्रा. डी. पी. कांबळे यांचे 'वर्तमान शिक्षणविषयक स्थिती, सरकार आणि विद्यार्थी व पालकांची भूमिका' या विषयावर व्याख्यान होईल. दसरा चौकातील शाहू स्मारक भवनाच्या मिनी हॉलमध्ये ५ ऑगस्ट रोजी दुपारी चार वाजता हे व्याख्यान होणार आहे. बौद्ध समाजातील दहावी व बारावी परीक्षेत ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार होईल.